MHAU080049452024

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२२/२०२४**
**जयसिंग हरगुनसिंग (गुरनासिंघाणी) खालसा –विरुध्द– महाराष्ट्र शासन व इतर**

**<u>निशाणी क्र.९७ खालील आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांनी अर्ज (नि.क्र.९४) वर पारीत झालेल्या आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जाच्या मागच्या बाजुवर सादर करून अर्ज मंजुरीस आक्षेप घेतलेला आहे.

२) संचिकेचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.२५.०८.२०२५ रोजीचा गैरअर्जदारांचा पुरावा बंद आदेश रद्दबातल होणेबाबतचा अर्ज (नि.क्र.९४) गैरअर्जदार यांना एकूण खर्च रक्कम रु.५०००/– पैकी रु.२५००/– ही अर्जदार व रु.२५००/– ही तालुका विधी सेवा प्राधिकरण समिती यांना पुढील तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी द्यावेत या निर्देशावर मंजुर केला होता. तथापि, प्रकरणात जवळपास ४ तारखा झाल्यानंतर गैरअर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे. प्रकरण अचल संपत्तीबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात असल्यामुळे गूणवत्तेवर निकाली काढण्याकरिता व न्यायाच्या दुष्टीने व अर्जातील नमुद कारण पाहता प्रसतुत अर्ज खर्च लावून मंजूरीस सबळ कारण दिसते. करिता, आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.क्र.९७) खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.२ ते ६ या अर्जाचा खर्च म्हणून रु.२५००/– (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) तालुका विधी सेवा प्राधिकारण समिती, सिल्लोड यांना, तसेच रु.२५००/– (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे

मात्र) हे अर्जदारांना दि.२६.०२.२०२६ रोजीपर्यंत द्यावेत आणि नि.क्र.९४ वरील आदेशात नमुद खर्च रक्कम रु.५०००/- ही देखील नि.क्र.९४ वरील आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे दि.२६.०२.२०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी भरावी.

३. जर गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांनी वर नमुद खर्चाची रक्कम भरली नाही तर गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांचा अर्ज आपोआप नामंजुर होईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2026.02.12 13:32:07 +0530

(सु. श. देशमुख)

दि.१२.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिल्लोड.